स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी.(Ph.D)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

"उच्च शिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास"
(विशेष संदर्भ - लातूर जिल्हा १९९६ ते २०१८)

-: मार्गदर्शक :-

डॉ.एस.पी.गायकवाड

उपप्राचार्य, समाजशास्त्र विभाग प्रमुख,

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

-: संशोधक :-

प्रा.नरवडे श्रीराम तुकाराम

समाजशास्त्र विभागप्रमुख

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर

अभ्यासकेंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

मे -२०१९

“उच्च शिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास” (विशेष संदर्भ - लातूर जिल्हा १९९६ ते २०१८)

प्रस्तावना :-

कुटुंब हा एक प्राथमिक समुह असुन भारतीय समाज जीवनात त्याचे अमूल्य महत्त्व आहे. कारण कुटुंबातूनच आपणाला बालपणापासून प्राथमिक शिक्षणाचे धडे मिळतात. कुटुंबातील सदस्याचे एकमेकांत आसलेले सहकार्य व त्यांच्यातील भूमिकांवर कुटुंबाचे अस्तीत्त्व आवलंबुन असते. कुटुंबातील एका सदस्यांने अथवा अनेक सदस्यांनी मिळून कुटुंबातील मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी श्रम करावेच लागते. पण हाताची पाची बोटे समान नसतात तसे कुटुंबातील सर्व सदस्य हे एक विचाराचे असू शकत नाहीत. त्यामुळे कुटुंबातील सदस्यात ताणतणावाचे व मतभेदाचे वातावरण तयार झालेले असते. त्यातुनच कुटुंबाला तडे जाण्यास सुरूवात होते.

कुटुंबातील ताणतणावाचा प्रत्यक्ष परीणाम कुटुंब सदस्यांवर पडतो. कुटुंबाला एक आदर्श प्राथमिक पाठशाळा म्हणून ओळखले जात असले तरी, मतभिन्नतेमुळे कुटुंबाला तडे जाण्यास सुरूवात होते. यामुळेच संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन, विभक्त कुटुंबानी त्याची जागा घेतली. त्यामुळे कुटुंबातील स्त्रीयांच्या दर्जात बदल झालेला दिसून येतो. आधुनिक काळात व्यवसाय, नौकरी इत्यादीची बंधने न राहिल्यामुळे अनेक स्त्री पुरूष नौकरी, व्यापार, उद्योगधंद्यात आपले लक्ष केंद्रीत करत आसलेले दिसुन येतात. त्यात शिक्षण, तंत्रज्ञान, जागतिकीकरण, औद्योगिकरण, शहरीकरणाची भर पडल्यामुळे, लोकांचे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतराचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

आशा वेगवेगळ्या कारणामुळे कुटुंबसंस्थेसमोर अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या आवडी निवडी व विचारातील कमकूवत पणा सुशिक्षित वर्गात वाढत आसल्यामुळे वृध्दांच्या समस्या डोके वर करून भारतीय कुटुंब व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने उभे करत आहेत.

१) बालसंगोपनाचा प्रश्नः-

कुटुंबाच्या बदलत्या रचनेचा, बदलत्या सामाजिक मुल्यांचा, बदलत्या कुटुंबाच्या कार्याचा परीणाम कुटुंबातील बालसंगोपनावर मोठ्या प्रमाणात झालेला असून उच्चशिक्षित कुटुंबात मुलांची

देखभाल करण्यासाठी प्रेमाचा सदस्य राहीलेला नाही. नौकरी व्यवसायासाठी पती पत्नी घर सोडत आसल्यामुळे पाळणागृह, अंगणवाडी, बालवाडीच्या माध्यमातून सुशिक्षित कुटुंबातील मुलांचे संगोपन होत असल्याचे समोर येत आहे.

२) वृध्दांच्या संगोपनाचा प्रश्न :-

संयुक्त कुटुंबात वृध्दांला एक मानाचे स्थान होते, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कुटुंबातील सदस्याचे आचरण व व्यवहार होत असे पण अलिकडील काळात कुटुंब संस्थेत झालेले बदल आणि कुटुंबातील सदस्यांच्या वाढलेल्या आशा आंकाक्षा व शिक्षणाचे वाढते प्रमाण लक्षात घेता अशिक्षित कुटुंबापेक्षा सुशिक्षित कुटुंबात वृंध्दांचे प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत आसल्याचे दिसून येते.

वृध्दांच्या मार्गदर्शनापेक्षा व त्यांच्या संगोपणापेक्षा आज सुशिक्षित कुटुंबातील आजी अजोबा, आई वडील कुटुंबासमोर एक मोठा भार बनत असून त्यांच्या अनेक प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केलेले आहे. त्यातुन अनेक वेगवेगळ्या प्रश्नाचीच सुरूवात झाली. बालकांसाठी शिशुगृह, पाळणागृह तर वृंध्दासाठी वृध्दाश्रम ही नवीन कलंकीत समस्या भारतीय समाजासमोर एक आव्हान म्हणून उभी आहेत. त्या समस्यांचा अभ्यास करणे हे माझे संशोधक म्हणून मी कर्तव्य समजतो.

मुला-मुलींना काळजाचा एक तुकडा समजून हातावरील फोडासारखे साभांळलेल्या मुलांनी माता-पितांची दोन भागात विभागणी केली आहे अथवा त्यावर ते समाधानी नसून त्यांच्या मृत्यूची वाट पाहत आहेत. वृध्दांच्या नावावरील असणारी स्थावर मालमत्ता व चलसंपत्ती मृत्यूनंतर आपणास मिळावी, याचे स्वप्न पाहणाऱ्या मुलांचे आई वडील हा एक अडथळा बनलेले आहेत. विधुर नीतीनुसार- “ज्या सभेत वृध्द नाहीत ती सभाच नाही. संयुक्त कुटुंबात वृध्दव्यक्तिना- मानसन्मान मिळत होता हे स्पष्ट होते.

व्याख्या :-

१. डॉ. मुजूमदार – "कुटुंब हा अशा व्यक्तींचा समूह आहे की, जे एकाच घरात राहतात, जे परस्परांचे रक्तसंबंधी असतात व स्थान, परस्परहित आणि परस्परांबद्दल असणारी कर्तव्याची जाणीव या आधारावर आम्ही सर्व एक आहोत ही भावना जोपासतात."

२. समाजकार्य ज्ञानकोषानुसार – "व्यक्तीच्या जीवनातील शेवटचा कालखंड म्हणजे वृध्दावस्था होय."

३ ."वृध्दत्त्व म्हणजे नवीन परीस्थितीशी जुळवून घेण्याच्या शरीराच्या सामर्थ्याचा ऱ्हास होय."

वृध्दांचे आजार व त्यांच्या गरजा आज पूर्ण होत नाहीत. त्यांच्या आशा अपेक्षा मावळत जात असून पाषाण ह्दयी मुलांना मी जन्म दिला नसता, मी वांज राहीले असते तर ही वेळ माझ्यावर आलीच नसती. या मुलांना शिक्षण शिकवले नसते तर गरीबीमध्ये आनंदाचे दोन घास व सुखाचे दोन दिवस जगता आले असते या विचारात आजचे वृध्द माता-पीता मानत आहेत. तरी देखील अजून निरक्षर समाजापेक्षा साक्षर समाजात वृध्दांचे प्रश्न गंभीर होत असल्याची जाणिव होत आहे.

वृध्द माता-पीत्यांना वृध्द आश्रमात प्रवेश दिल्यानंतरही माझ्या मुलांचे चांगले व्हावे म्हणून प्रार्थना करणारे वृध्द आज लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहेत. लातूर जिल्ह्यातील वृध्दाश्रमात बहुतांश वृध्द हे शिक्षित कुटुंबातील आसल्याची माहिती मिळते आहे. वृध्दाश्रमामध्ये प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर, वकिल, यांचे माता-पिता मोठ्या प्रमाणावर असल्याचे आहेत. आपण वृत्तपत्रातून वाचून आहोत, डॉक्टर मुलगा आपल्या शेवटच्या विधीला देखील आलेला नाही. यासारख्या आशा अनेक उच्चशिक्षित कुटुंबातील वृध्द आणि त्यांचे प्रश्न संशोधक म्हणून मी संशोधनासाठी हा विषय निवडला आहे. तेव्हा जेष्ठ नागरीकांच्या प्रश्नाचा अभ्यास करून जनजागृती व्हावी व या समस्यांची तीव्रता कमी व्हावी यासाठी मी लातूर जिल्ह्यातील शिक्षित कुटुंबाच्या सदस्यांचा अभ्यास करुन वृध्दांच्या प्रश्नांवर संशोधन करणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –

लातूर जिल्हा हा माझ्या कार्यातील संशोधनातील मर्यादा असून इ.स. १९९६ ते २०१८ या २२ वर्षाचा अभ्यास करणे हा संशोधनाचा हेतू आहे. खरे तर उच्च शिक्षित कुटूंबातील वृध्दांची समस्या ही जागतीक पातळीवरची असली तरी मी महाराष्ट्रातील लातूर जिल्हा हा संशोधनासाठी घेतला आहे. लातूर जिल्ह्यातील खालील तालूक्यांचा अभ्यास संशोधनाचा विषय डोळ्यासमोर ठेवून करण्यात येणार आहे.

१. लातूर तालुका – १० कुटूंबांचा अभ्यास	६. अहमदपूर तालुका – १० कुटूंबांचा अभ्यास
२. रेणापूर तालुका - १० कुटूंबांचा अभ्यास	७. शिरून आनंतपाळ – १० कुटूंबांचा अभ्यास
३. औसा तालुका – १० कुटूंबांचा अभ्यास	८. निलंगा तालुका - १० कुटूंबांचा अभ्यास
४. उदगीर तालुका – १० कुटूंबांचा अभ्यास	९. देवनी तालुका - १० कुटूंबांचा अभ्यास
५. जळकोट तालुका- १० कुटूंबांचा अभ्यास	१०. चाकुर तालुका - १० कुटूंबांचा अभ्यास

१९८२ ला उस्मानाबादचा एक भाग म्हणून ओळखला जाणारा लातूर तालूका लातूर जिल्हा झाला. भौगोलिक आकाराने लातूर जिल्हा हा राज्यात १६ व्या क्रमांकावर असून देश पातळीवर तो १८१ या क्रमांकाचा आहे. लातूर जिल्हा हा कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्याच्या सिमेलगत आहे. २०११ च्या जनगननेनुसार लातूरची लोकसंख्या २,४५,४,११६ आहे. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था मान्यता प्राप्त असून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण (पदवी व पदव्युत्तर) या जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणारे आहेत. या जिल्ह्यातील अनेक शाळा, महाविद्यालयात शिक्षणा बरोबर घेतले व नैतिक व संस्कारिक शिक्षणाचे धडे लातूर जिल्ह्यात कमी पडत असल्यामुळे वृध्दांचा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यातून वृध्दांच्या लोकसंख्येत व त्यांच्या गंभीर समस्येत वाढ झाल्याचे दिसून येते आहे. त्यामुळेच इ.स. १८९६ रोजी मातोश्री वृध्दांश्रम आंबाजोगाई रोड लातूर

येथे सूरू झाला. शासकीय अनुदानावर चालत असलेल्या वृध्दाश्रमात सद्यःस्थितीला ५५ आजी-आजोबा आपले कुटुंब सोडून वृध्दाश्रमात स्थायीक झाल्याचे दिसत आहेत. कालांतराने प्रत्येक वृध्दास ६०० रुपये शासकीय अनुदान मिळत असलेले बंद झाले. आज हे वृध्दांश्रम दानशूरांच्या दानातून व मदतीतून चालत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अनेक वृध्दांच्या समस्या संशोधक म्हणून चिकित्सक पध्दतीने संशोधनात मी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रस्तुत संशोधन अभ्यासक्षेत्रासाठी लातूर जिल्हा व त्याअंतर्गत असणारे १० तालूके घेण्यात आलेले आहेत. लातूर हा काही वर्षापासून शिक्षणाचा पॅटर्न म्हणून ओळखला जातो. त्या शिक्षण पंढरीतील वृध्दांकडे एक दृष्टिक्षेप टाकणे मी संशोधक म्हणून मला महत्त्वाचे वाटते.

विषय निवडी मागील भूमिका :-

भारतीय सामाजिक संस्था म्हणून कुटूंबसंस्था, विवाहसंस्था, शिक्षणसंसथा व राज्यसंस्था, अर्थसंस्था अशा प्रकारच्या अनेक संस्था महत्वाच्या माणल्या जातात. त्यामुळे कुटुंबसंस्था ही समाजिक संस्थेची खरी जणनी आहे म्हणून या संस्थेवर वृध्दांच्या समस्येमुळे मोठा आघात होत असल्याचे दिसून येते. संशोधनासाठी हा एक नवीन विषय असून या समस्येचे उच्चाटन होण्यासाठी सविस्तर पणे समाजशास्त्राचा एक अभ्यासक म्हणून मला संशोधन करता येईल.

वृध्दांच्या समस्या या विषयावर नव्याने संशोधन घेणे गरजेचे आहे असे मला वाटते म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. या संशोधनाच्या माध्यमातून उच्च सुशिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्येला वाचा फुटणार आहे म्हणून समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून या कंलकीत समस्येचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो.

सदरील संशोधनात वृध्दांच्या समस्या निर्माण का झाल्या, त्यामागे त्याची शैक्षणिक, आर्थिक, मानसिक इत्यादी कारणे होती. त्यांचा शोध संशोधनात घेतला जाणार आहे. वृध्दांच्या समस्यांचे वास्तविक कारणे, संशोधनाच्या अनुषंगाने शोधणे व त्याचा परिणाम म्हणून भारतीय कुटुंब व्यवस्थेचा ऱ्हास आणि त्यावर उपाय शोधणे ही या संशोधनाच्या पाठीमागची भूमिका असणार आहे.

यासाठी संशोधनाचे हे प्रयोजन आहे. सदरिल संशोधन हे उपलब्ध साधणे व स्त्रोताच्या अधिन राहून केले जाणार आहे. त्यासाठी सर्व मर्यादांचे भान ठेवले जाणार आहे.

संशोधनाचे महत्त्व :-

समाजजीवनात संस्काराला महत्त्वाचे स्थान होते पण आज ज्या आई-वडिलांनी आपल्यासाठी दिलेले योगदान व त्याच योगदानासाठी आपण त्यांची वृध्दाश्रमांकडे होत असलेली रवानगी पहाता हा विषय कुटुंबसंस्थेसाठी फार गंभीर स्वरूप धारण करत आहे.

वृध्दांच्या समस्यांचा अभ्यास करत असताना त्यांच्या सामाजिक,मानसिक, आर्थिक, शारीरिक पैलूंचा अभ्यास फार मोठा प्रभावशाली व वर्तन पध्दती निश्चित करणारा म्हणून समाजाशास्त्रज्ञांच्या दृष्टिने महत्त्वाचा वाटतो तो समाजाकार्याच्या दृष्टिने तितकाच महत्त्वाचा आहे. कारण वृध्दांना त्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी सेवांची आवश्यकता आहे. जेथे-जेथे समस्यांनी गंभीर रूप धारण केले आहे. तेथे सेवांची पूर्तता करणे ही जशी शासनाची कल्याणकारी राज्य म्हणून जबाबदारी ठरते तशी समाजिक बांधिलकी म्हणून समाजाची व सेवाभावी संस्थेची, दानशूर जनतेची बांधिलकी असणे गरजेचे आहे. म्हणून वस्तूनिष्ठ संशोधनाला शास्त्रीय रूप प्राप्त करून देणे व वृध्दांच्या समस्येचे निराकरण करणे हे संशोधनाचे महत्त्वाचे कार्य डोळ्यासमोर ठेवून सदरील संशोधन करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

समाजशास्त्राचा एक विद्यार्थी म्हणून सामाजिक संशोधनाचा अभ्यास करत असताना निवडलेला विषय डोळ्यासमोर ठेवून काही उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहेत.

१. कुटुंब विघटनाच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

२. उच्चशिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण व शहरी भागातील वृध्दांच्या समस्येची अभ्यास करणे.

४. जेष्ठ नागरीकांची वाढत जाणारी लोकसंख्या जाणून घेणे.

५. वृध्दांच्या सामाजिक, आर्थीक व मानसिक स्थितीचा अभ्यास करणे.

६. वृध्दांसाठी राबविण्यात येणाऱ्या सरकारी आणि निमसरकारी योजना व उपक्रमांचा अभ्यास करणे.

७. वृध्दांच्या समस्या निर्मुलनासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची गृहीतके :-

सामाजिक शास्त्रातील संशोधनासाठी वैधानिक पध्दतीचा अवलंब केल्याशिवाय संशोधन कार्यात शास्त्रीय ज्ञानाची निर्मीती करता येत नाही. यासाठी संशोधकाला एखादा अभ्यास विषय निश्चित ठरविल्यानंतर त्या विषयाबाबत काही उपकल्पना गृहीत धराव्या लागतात. निवडलेल्या विषयातील समस्यांचे निराकारण करण्यासाठी काही संभाव्य उत्तरे व अंदाज बांधावे लागतात. त्यामुळे संशोधनाची दिशा आणि गती ठरविता येते. गृहीत कृत्यावर संशोधनाच्या निष्कर्षाचे स्वरुप बरेचसे अवलंबून असते. गृहीत संशोधनाच्या ध्येयपूर्तीसाठी व संशोधन कार्यातील अडथळे दूर करण्यासाठी गृहीतकृत्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. संयुक्त कुटुंबाच्या विघटनातून उच्चशिक्षित कुटुंबात वृध्दांच्या समस्या निर्माण होत आहेत.

२. कुटुंबातील कर्त्या स्त्री पुरूषांच्या अर्थार्जनातील वाढत्या सहभागामुळे वृध्दांच्याकडे दूर्लक्ष होत आहे.

३. निरक्षर समाजापेक्षा उच्चशिक्षीत समाजांचे वृध्दांकडे दुर्लक्ष होत आहे.

४. वृध्दांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे कुटुंबसंस्थेसमोर एक आव्हान उभे राहीलेले आहे.

५. लातूर जिल्ह्यात विशेषतः शहरी भागात वृध्दांचे प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहेत.

६. संयुक्त कुटुंबाच्या विघटनाची परिणीती म्हणून वृध्दांच्या गंभीर समस्या भेडसावत आहेत.

संशोधन विषयाची निवड :-

प्रस्तूत संशोधनाच्या विषयाच्या निवडीचा विचार माझ्या मनात मातोश्री वृध्दाश्रमातून निर्माण झाला. या वृध्दांश्रमात आलेला आजी-आजोबा बरोबरचा संवाद लक्षात घेता कित्येक वृध्दांचे मुले उच्चशिक्षित आसल्याची जाणीव झाली. जेष्ठ नागरीका विषयची व त्यातल्यात्यात ज्यांना आपण

आदर्श माता-पिता म्हणतो त्यांची होत असलेली परवड लक्षात आली. शिक्षण हे वृध्दांसाठी शाप कि वरदान अशा गोंधळलेल्या मानसिकतेवर मी आलो. अशा वृध्द आजी-आजोबांना सतत कोणाच्या तरी आधाराची गरज असते याची जाणीव झाली. त्यामुळे लहानपणी आईचा, तारूण्यात पतीचा किंवा पत्नीचा तर म्हातारपणी दूबळ्या, हळव्या मनाला मुलांच्या आधाराची गरज असताना अशा शिक्षित कुटुंबातील मुलांनी भौतिक सुखाच्या लोभासाठी व किरकोळातील किरकोळ कारणासाठी माता-पित्यांना परके करणे ही बाब मला वृध्दांश्रमात गेल्यानंतर लक्षात आली. त्यावरून संशोधन विषयाची निवड करण्याचे ठरवले. जेष्ठांना कुटुंबात जो मानसन्मान होता ते कुटुंबाचे मार्गदर्शक होते व त्यांना प्रतिष्ठा होती. मग जेष्ठांना उतारवयात देखभाल करण्यासाठी सेवासुविधा पुरवण्यासाठी हे सुशिक्षित लोक का कमी पडतात हे तपासणे संशोधन विषय निवडीचा उद्देश आहे.

संशोधनाचा आराखडा :-

प्रत्येक सामाजिक संशोधन वस्तूनिष्ठ करायचे असेल तर संशोधन आराखड्या शिवाय ते अशक्य असते. संशोधनाच्या पहिल्या टप्प्यात संशोधन आराखड्याची संशोधकाला गरज भासते. संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यासपुर्तीसाठी संशोधन आराखड्याला फार महत्त्व असते.

संशोधन कार्यात संशोधन आराखडा महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. म्हणून संशोधन विषयास वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन आराखडा संशोधन कार्यासाठी संयुक्तरित्या वापर करण्यात येणार आहे.

आराखड्यातून संशोधन कार्याला दिशा भेटते व निर्माण होणारे प्रश्न सहज रित्या सूटू शकतात.

वर्णनात्मक संशोधन आराखड्याला एखादा समाज किंवा समुह किंवा संस्था साक्षर निरीक्षर यांचे वर्णन करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचीच निवड करावी लागते. तर एखाद्या समस्यांची कारणे परीणाम शोधायची असतील तर समस्यांच्या कारणांचे म्हणजेच मुळांचे निदान लावणे फार गरजेचे असते. म्हणून संशोधनासाठी निदानात्मक संशोधन आराखडा निवडला गेला आहे.

नमुना निवड प्रक्रिया :-

उच्चशिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्या जगाच्या इतिहासात आपणाला पाहाता येतील पण एका शितावरून भाताची परीक्षा पहाण्यासाठी आपण लातूर जिल्हाची निवड केली आहे. त्यामुळे संशोधन कार्याची मर्यादा व वस्तुनिष्ठ संशोधन निर्मीतीसाठी नमुना निवड प्रक्रिया संशोधनात महत्त्वाची ठरते.

प्रस्तूत संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवडीचा अंतर्गत सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवडपध्दतीने ५०० एककांची निवड लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यांतून केली आहे. लातूर जिह्याची एकूण लोकसंख्या २,४५,४,११६ इतकी आहे. त्यातील वृध्दांच्या समस्या सर्वत्रय असू शकत नाहीत. त्यापैकी काही कुटुंबाचा नमुना म्हणून संशोधन कार्यात अभ्यास करण्याचा उद्देश आहे. जिल्ह्यात एकूण ७८६ ग्रामपंचायती असून ९४५ गावे व १० तालुके आहेत. त्यापैकी ५० गावांची निवड व त्यापैकी प्रत्येक गावातून १० कुटुंबाची नमुना म्हणून संशोधन कार्यासाठी समाविष्ट केला जाणार आहे.

तथ्य संकलन :-

सामाजिक संशोधनासाठी वेगवेगळ्या पायऱ्यांनी अध्ययन करावे लागते आणि संपुर्ण संशोधन हे तथ्य संकलनावर अवलंबून असते. त्या तथ्यांच्या आधारावरच संशोधन कार्य केले जाते. तथ्यांचे मुख्य दोन स्त्रोत असतात. ते पूढीलप्रमाणे

१) प्राथमिक स्त्रोत :-

क्षेत्रीय शोध पध्दतीने संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोताला महत्त्वाचे स्थान आहे. त्यात प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, अनुसूची यांच्या माध्यमातून १० तालुक्यांतील उच्चशिक्षित ५० कुटुंबाचा अभ्यास केला जाणार आहे.

२) दुय्यम स्त्रोत :-

संशोधन कार्यासाठी प्राथमिक स्त्रोतांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तथ्यांना वस्तुनिष्ठतेची जोड देण्यासाठी वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिक, नियतकालिके, वार्षीकअंक, वेगवेगळे ग्रंथ, लेख, इंटरनेट,

लातूर जिल्हा (दर्शनिका), महाराष्ट्र राज्य दर्शनिका, न्यायालयीन माहिती इत्यादि द्वारे तथ्यांची निर्मीती करून वस्तूनिष्ठ संशोधन केले जाणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण :-

संशोधन कार्यासाठी प्राप्त केलेल्या तथ्यांना एकत्र केले म्हणजे संशोधन पूर्ण होत नाही. त्यासाठी निवडलेल्या संशोधन विषयाची माहिती डोळ्यासमोर ठेवून उद्देशानुरूप विश्लेषण केले पाहिजे. वरील गृहितकृत्यांची पडताळणी करून निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी खालील पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

१) तथ्यांचे परीक्षण २) तथ्यांचे वर्गीकरण ३) तथ्यांचे सांकेतिकरण

४) सारणीकरण ५) पृथ्थकरण

या वरील पध्दतींचा आधार घेवून वस्तूनिष्ठ संशोधनाचा मार्ग सुकर होणार आहे.

प्रकरण पहिले

कुटुंबसंस्थेची पार्श्वभूमी

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशात वेगवेगळ्या संस्था सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक आहेत. त्यात शिक्षणसंस्था, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था व अर्थसंस्था या मानवी मुल्यांचे संवर्धन करणाऱ्या संस्था म्हणुन ओळखल्या जातात. त्यापैकी कुटुंब संस्थाही एक आधारभूत सामाजिक संस्था असून, कुटूंबाशिवाय समाजाच्या सातत्याची व निरंतरतेची कल्पनाच करता येत नाही. कुटुंबाचा विचार करताना व्यक्तिचे एकत्रीकरण म्हणजे कुटुंबाचे नव्हे तर एका विशिष्ट प्रकारच्या समाजिक संबंधाची ती एक व्यवस्था आहे. म्हणूनच कुटुंबसंस्थेचा सामाजिक संशोधनात अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. कुटुंबाचा अर्थ, व्याख्या, कुटुंबाचे उद्देश, कुटुंबाची वैशिष्ट्ये, कुटूंबाचे कार्य, कुटुंबाचे प्रकार व कुटुंबाचे बदलते स्वरूप या प्रकरणात अभ्यासण्यात येणार आहे.

Sociology of Family या पुस्तकात एलमर यांनी Family या शब्दाची व्युत्पत्ती दिली आहे. Family हा शब्द Famalus या लॅटिन शब्दापासून तयार झाला असून हा शब्द अशा मानवी

समूहाकडे निर्देश करतो की, ज्यात माता-पिता त्यांची मुले इतकेच नव्हे तर गुलाम व नोकर यांचाही समावेश होतो, परंतु हे स्पष्टीकरण शाब्दिक स्वरुपाचे आहे.

प्रकरण दुसरे

कुटूंबसंस्थेतील समस्या

भारतात आदिवासी, ग्रामीण, शहरी असे तीन प्रकारचे समुदाय असून या समुदायात असणाऱ्या वेगवेगळ्या कुटूंबसंस्था अभ्यासणे व या कुटूंबसंस्थेतील समस्या त्याची कारणे व त्याचे परीणाम, संशोधनाचा एक विषय म्हणून अभ्यासणे महत्वाचे आहे. कुटूंबसंस्थेतील बदलाचा एक भाग म्हणून वरील वेगवेगळ्या समुदयातील कुटूंबसंसथेच्या समस्यांचा अभ्यास या प्रकारणाच्या अनुषंगाने करण्यात येणारअ आहे.

प्रकरण तिसरे

लातूर जिल्ह्यातील उच्चशिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्या

लातूर जिल्ह्यात अनेक कुटुंबसंस्था आहेत. त्यापैकी उच्च शिक्षीत कुटुंबातील सदस्यांच्या मतभेदांचा अभ्यास करणे. आणि या कुटुंबातील वृध्दांच्या समस्या जाणून घेऊन त्याचे कुटुंबसंस्थेवर होणारे आघात या प्रकरणाच्या अनुषंगाने अभ्यासण्यात येणार आहेत. भौतिक सुखाच्या लोभासाठी व्यवसाय, नौकऱ्यात काम करणाऱ्या कुटुंब कर्त्या स्त्री पुरूषांना वृध्द एक मोठी अडचन वाटत असून त्याचे प्रश्न सोडवण्यापेक्षा त्या प्रश्नात निर्माण होणारी जठिलता या प्रकरणात अभ्यासली जाणार आहे. त्यासाठी लातूर जिल्ह्यातील उच्चशिक्षित कुटुंबाचा त्यामुळे संशोधनात लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यातील प्रत्येक ०५ कुटुंबाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

लातूर जिल्ह्यातील वृध्दाश्रम

१९९६ ला स्थापन झालेल्या मातोश्री वृध्दाश्रमात कित्येक वृध्द वेगवेगळ्या कारणाने वृध्दाश्रमात रहात असल्याचे दिसून येते. त्यापैकी ग्रामीण-शहरी, साक्षर-निरक्षर कुटुंबातील वृध्दांची संख्या

वृध्दाश्रमात दिवसेंदिवस वाढत आहे. आज या वृध्दाश्रमात एकूण ३१ आजी व २४ अजोबा वास्तव्यास आहेत. वृध्दाश्रमाचे व्यवस्थापन व त्यांना मिळाणारे शासनाचे अनुदान व सुख सुविधा लक्षात घेता त्या अपुऱ्या आहेत. म्हणून काही दानशूर लोक पुढे येऊन आर्थिक मदत करत असून वाढदिवस, पुण्यतिथी साजरी करत असलेले दिसून येतात. या वृध्दाश्रमात भजन, किर्तन, प्रवचन, असे मनोरंजनाचे कार्यक्रम आश्रमात चालत असल्यामुळे वृध्दांना आपल्या समस्येतून काहींसा दिलासा मिळत असल्याची जाणीव होते. अशाप्रकारच्या विषयावर संशोधक म्हणून संशोधन करणे हे या पाठाचा हेतू आहे.

प्रकरण पाचवे

लातूर जिल्ह्यातील वृध्दांचे आश्रमातील पुनर्वसन

वृध्दाश्रमातील वृध्दांना त्यांच्या स्वप्नाच्या घराची ओढ असतेच पण कुटुंबातील तानतणाव व कलह कुटूंब सदस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदललेला आसल्यामुळे काही वृध्दांचे आश्रमातील स्वगृही पुनर्वसन होते. वृध्दांना देखील आपल्या कुटुंबातील इतर सदस्यांची सातत्याने आठवण होत असल्यामुळे त्यांना वृध्दाश्रमात प्रेमाचा आधार देणारी रक्ताचे नाते कमी असल्याची जाणीव होते. व मुला-मुलींना आपले आईवडील वृध्दाश्रमात सोडल्यामुळे समाजाचे बोलणे खावे लागते, प्रसंगी त्यांची मानहानी होते. त्यामुळेच आईवडिलांची कुटुंबाला गरज आहे व त्यांच्या आरोग्याची आपणच काळजी घेतली पाहिजे याची जाणीव झाल्यामुळे वृध्दाश्रमात सोडलेल्या मातापित्यांचे कुटुंबाकडे पूर्नवसन होते हे या पाठाच्या अनुषंगाने अभ्यासण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व शिफारशी

या पाठामध्ये वृध्दांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने समस्याची सोडवणूक करण्यात येणार आहे. यात कुटुंबातील सदस्यासमोर समुपदेशन वेगवेगळ्या शासकिय योजना यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संदर्भसूची :-

१. डॉ.गोडबोले अरविंद - वृध्द आणि त्यांचे प्रश्न – १९७८

२. मुत्तगी पी.के - वृध्दत्त्व देशोदेशी – २००३

३. संत दि.म. - वृध्दाश्रम एक काळाची गरज -२००४

४. भागवत वि.गो. – ज्येष्ठ नागरिकांचा सुख सोबती – २००५

५. गलगली गोपाळ – तरूण वृध्दांनो मुद्दल खर्च करायला लागा – २००५

६. जोशी शरदचंद्र – ज्येष्ठ नागरिक- एक मुक्तचिंतन – २०१०

७. डॉ.कुलकर्णी डी.एस. – ज्येष्ठ नागरिक कायदा – २०११

८. श्री कासले (व्यवस्थापक) - मातोश्री वृध्दाश्रम यांची मुलाखत

९. मातोश्री वृध्दाश्रमातील आजी-अजोबांशी संवाद

१०. डॉ.भोईटे/डॉ.बोबडे- सामाजिक संस्था

११. प्राचार्य डॉ.संजय वाघमारे - संशोधन पध्दती

१२. डॉ. सुभाष दांडेकर – चाळिशीनंतरची वाटचाल

१३. सविता जाजू - स्वागत करुया उतारवयाचे!

१४. डॉ.शीला द. देशपांडे- कुटुंबसंस्था आणि परित्यक्ता स्त्री

१५. डॉ.सुरेश वाघमारे- सामाजिक संरचना

मार्गदर्शक

डॉ.एस.पी.गायकवाड

उपप्राचार्य, समाजशास्त्र विभाग प्रमुख,

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

संशोधक

प्रा.नरवडे श्रीराम तुकाराम

समाजशास्त्र विभागप्रमुख

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर

संशोधक	:	प्रा. श्रीराम तुकाराम नरवडे समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर
विषयाचे नाव	:	समाजशास्त्र
मोबाईल नं.	:	**8625086251**
ई-मेल	:	**shriramnarwade917@gmail.com**
मार्गदर्शकाचे नाव	:	उपप्राचार्य डॉ. गायकवाड एस.पी. दयानंद कला महाविद्यालय, लातूर मो.नं. ८६६८३३५१२५
ई-मेल	:	**spg.latur@gmail.com**
संशोधन विषयाचे शीर्षक	:	“उच्च शिक्षित कुटुंबातील वृध्दांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास” (विशेष संदर्भ-लातूर जिल्हा १९९६ ते २०१८)